# २०
# तुम्ही येशूबाबत काय कराल?

**हे** जग पाहिले तर मोठे आणि गुंतागुतीचे जटिल आहे, तथापि शास्त्रलेखांनुसार हे जग केवळ पूर्वतयारीचे ठिकाण आहे. आम्ही सर्वकाळ जे जीवन जगणार त्याची तयारी येथे होत असते. तेव्हा येथील जीवन केवळ अल्पस्वल्प प्रारंभ आहे. प्रत्येक मानवप्राणी जिवंत आत्मा आहे. या जगापलीकडे स्वर्गात अगर नरकात राहणे हेच त्याचे भवितव्य आहे. नव्या करारातून आम्हाला सार्वकालिक जीवन व सार्वकालिक विनाश या दोन्ही गोष्टी दाखवल्या आहेत (मत्तय.२५:४६). सार्वकालिक जीवन आणि सार्वकालिक मरण या दोहोंच्या दरम्यान आम्हाला मरणोत्तर राहता येईल अशी जागाच नाही. मरणाच्या वेळी अगर येशू परत येईल हे केव्हाही होवो आमचे भवितव्य निश्चित ठरले आहे. सार्वकालिक जगामध्ये प्रवेश केल्यावर देवाबरोबरचे आमचे नाते बदलण्यास पुन्हा दुसरी संधी मिळत नाही– मिळणार नाही आम्हाला नीट भानावर आणणारा हा विचार आहे. आपण येशूचे काहीही केले तरी त्याचे सार्वकालिक परिणाम होणारच यात जराही शंका नाही. तुम्हाला आर्जवे करून विनवून सांगतो आत्ताच निर्णय घ्या, ख्रिस्ताचा स्वीकार करा, ख्रिस्ती व्हा, ख्रिस्तासाठी जगत राहा, त्यामुळे आता तुम्हाला विपुल जीवन मिळेल (योहान १०:१०). आणि सार्वकालीक जीवन येणाऱ्या दिवसात मिळेल (१ योहान २:२५).

मंडळीचा विश्वासू सभासद कसे व्हावे, हा अभ्यास आता संपणार आहे. शास्त्रलेखात या विषयाची चर्चा आहेच. येशू ख्रिस्ताची–देवाच्या पुत्राची आणि तुमची थोडीशी ओळख झाली आहे, तो या जगामध्ये आला, आपले जीवन, शिक्षण व प्रीती यांच्याव्दारे त्याने आम्हाला देव कसा आहे, त्याची इच्छा काय आहे त्याचे प्रात्यक्षिक दाखवले. तो वधस्तंभावर आमच्या पापांसाठी मरण पावला तारणाचा त्याने दिलेला संदेश स्वीकारून आज्ञापालन करणाऱ्या कोणालाही देवाचे मूल होऊन जीवनक्रम

चालवणे आता शक्य झाले आहे. याशिवाय तुम्ही येथे मंडळीचा नीट काळजीपूर्वक अभ्यास केला आहे. त्याचे जीवन व मरण यातून मंडळीचा उगम – उद्‌भव झाला आहे आणि आजही हाच मंडळीचा आधार आहे. मंडळीमध्ये प्रवेश कसा होतो आणि या जगात त्या मंडळीत कसे राहता येते हे तुम्ही पाहिले आणि आता तुम्ही या महाप्रश्नाकडे आला आहा – मी येशूविषयी काय करावे? या प्रश्नाचा तुम्ही कधी विचार केला आहे काय?

सर्व ख्रिस्ती लोकांची अगत्याची प्रार्थना व उत्कट आशा हीच आहे. की तुम्ही आपल्या मना अंत:करणात ख्रिस्ती होऊन येशूचा विश्वासू, एकनिष्ठ अनुयायी होण्याचा निश्चय करून त्याप्रमाणे उरलेल्या जीवनात अखेरपर्यंत वागाल हा अभ्यासक्रम चालू असताना कदाचित तुम्ही स्वत:शी म्हणाला असाल मला ख्रिस्ती व्हायचंय. कदाचित तुमच्या मनात विचार आला असेल ख्रिस्ती होण्याविषयी माझे काही प्रश्न आहेत. त्या प्रश्नांची उत्तरे मिळाली की मी ख्रिस्ती होईन.

तुम्हाला प्रश्न विचारायचे आहेत तर या पुस्तकाचा उरलेला भाग नीट बारकाईने वाचा. त्यातून काही उत्तरे मिळतील. ख्रिस्ती होऊन, ख्रिस्ती जीवन जगण्यासाठी केल्या पाहिजेत अशा टप्प्यांचा काही उल्लेख व स्पष्टीकरण येथे केले आहे.

## टप्पा एक : तारण

ख्रिस्ती होणे ही पहिली पायरी–पहिला टप्पा आहे. जगामधील कोणालाही, कोठेही ख्रिस्ती होता येते मात्र त्यासाठी त्याने ख्रिस्तावर विश्वास ठेवला पाहिजे (योहान.८:२४), त्याने पश्चात्ताप केला पाहिजे (अगर आपली पापे सोडून मागे वळले पाहिजे प्रे. कृ.१७:३०), त्याने येशू हा ख्रिस्त आहे अशी कबुली दिली पाहिजे (रोम. १०:१०). आणि पापे पुसून टाकली जावीत यासाठी ख्रिस्तामध्ये बाप्तिस्मा घेतला पाहिजे (प्रे. कृ.२:३८).

आता तुमच्या काही (संभाव्य) प्रश्नांची उत्तरे देऊ या:

### "मुलांचे काय?"

नव्या करारामध्ये बालके, अर्भके अगर लहान मुले यांना बाप्तिस्मा देण्याविषयी कधीच उल्लेख केलेला नाही. त्यांना बाप्तिस्मा देण्याची गरज नाही, कारण प्रभूसमोर ती सर्व आपल्या निष्पाप सरलतेमध्ये सुरक्षित आहेत. त्यांना बऱ्यावाईटाचा, योग्य–अयोग्य यातील भेद समजत नाही म्हणून देवाच्या दृष्टीने त्यांच्यावर जबाबदारी,

उत्तरदायित्व नाही. प्रभूला आपल्याकडून काय हवे त्याची जाणीव झाली की मग त्यांनी ख्रिस्ती व्हावे (इतर सर्व लोकांनी तसेच व्हावे). त्यांनी प्रभूने दाखवलेल्या तारणाच्या मार्गाचा स्वीकार व आज्ञापालन करावे. त्यांच्या निर्दोषतेत ती सर्व देवासमोर सुखरूप, सुरक्षित आहेत, कारण त्यांनी पाप केलेले नाही. आता ती आहेत त्या स्थितीमध्ये आपल्या मना अंत:करणांनी सर्व काही समजून घेण्यास आतुर आहेत, त्यांना मार्गदर्शन करणाऱ्यांवर संपूर्ण विश्वास ठेवतात, त्यांचा निर्भर विश्वास आणि शिकण्याची तयारी याचे प्रौढांनीही अनुकरण करावे (मत्तय.१८:३). येशूने मुलांच्याविषयी म्हटले आहे, ... स्वर्गाचे राज्य त्यांच्या सारख्यांचेच आहे (मत्तय.१९:१४).

तुम्ही तरुण व्यक्ती असा वा प्रौढ असा, तुम्हाला तारणाचा मार्ग माहिती आहे, समजला आहे, आपण देवासमोर पापी आहोत. पाप केले आहे आणि तारण होण्यासाठी ख्रिस्ती झाले पाहिजे ही खात्री पटली आहे तर आता तुम्ही प्रभूने केलेल्या तारणाच्या योजनेचे आज्ञापालन केले पाहिजे.

### ‘‘मी काय केले पाहिजे?’’

ख्रिस्ती कसे व्हावे ते आपण या अभ्यासामधून पाहिले आहे. येशू देवाचा पुत्र आहे. याविषयीची शास्त्रलेखांमधील साक्ष व प्रमाण पुरावे स्वीकारून तुम्हाला ख्रिस्ती होता येते. पवित्र शास्त्र हे खरोखर जगातील एकमेव अचूक, सत्य पुस्तक आहे. येशू कोण आहे. तो या जगात काय करण्यासाठी आला ते पवित्र शास्त्रातून सांगितले आहे. तुम्ही या संदेशाचा स्वीकार करता का? स्वीकार केला असेल तर येशू ख्रिस्त देवाचा पुत्र आहे, तुमच्या पापांपासून तुमचे तारण व्हावे, सुटका व्हावी आणि तुम्हाला देवाचे मूल होता यावे यासाठी वधस्तंभावर मरण सोसण्यासाठी तो या जगात आला.

तुम्ही ही प्रश्न स्वत:ला विचारावा मी माझ्या पापापासून मागे वळलो आहे काय? या जगामध्ये कोणीच कधी परिपूर्ण होऊ शकत नाही. पण पश्चात्ताप करून आपल्या जीवनातून पाप काढून टाकण्याचा निश्चय करा. आणि येशूने पुढे प्रभूच्या वचनाप्रमाणे मन:पूर्वक जीवनक्रम चालवा. तुम्ही खरोखर पश्चात्ताप केल्यावर येशूच तुमचा प्रभू होईल आणि शास्त्रलेख तुम्हाला जीवनात सतत मार्गदर्शन करतील.

तुमच्या पापांची क्षमा व्हावी यासाठी ख्रिस्तामध्ये बाप्तिस्मा घेण्यासाठी तयार व्हा. तुमच्या समाजात जवळ्यास ख्रिस्ती मंडळी असेल तेथे जा. त्या मंडळीच्या एखाद्या सभासदाला भेटा. ख्रिस्तामध्ये बाप्तिस्मा देणाऱ्या योग्य व्यक्तीविषयी त्याला विचारा. या ख्रिस्ती माणसाची ओळख झाली की त्याला सांगा, मला सर्वांसमक्ष येशू हा ख्रिस्त

आहे. अशी साक्ष द्यायची आहे आणि त्याने तुम्हाला ख्रिस्ताच्या आध्यात्मिक देहात मंडळीत तुमच्या पापांची क्षमा व्हावी यासाठी बाप्तिस्मा द्यावा अशी विनंती करा. तो तुम्हाला आनंदाने साहाय्य करील.

**''ख्रिस्ताची मंडळी मला कशी सापडेल?''**

सध्याच्या धार्मिक गोंधळाच्या वातावरणात तुम्हाला प्रभूच्या मंडळीत जाण्यासाठी योग्य बंधूजनांची गरज आहे. जे अगोदरच प्रभूच्या मंडळीमध्ये आहेत आणि जे प्रभूची मंडळी म्हणून कार्य करीत आहेत, अशा समूहाशी तुम्ही संपर्क साधावा. यासाठी ते स्वत:चा उल्लेख कसा कोणत्या नावाने करतात ते नीट पाहा. ते मानवी नावे घेणार नाहीत, मिरवणार नाहीत. ते स्वत:ला ख्रिस्ताची मंडळी म्हणतील आणि शास्त्रलेखामध्ये मंडळीसाठी योजिलेली इतर नावे अभिधाने घेतील. त्यांनी स्वत:ला दिलेले नाव पवित्र शास्त्रानुसार नसेल तर त्यावरून ते एखाद्या पंथाचा भाग आहेत आणि म्हणून प्रभूच्या मंडळीहून वेगळे व विभक्त आहेत हे लक्षात येईल. एखाद्या उपासक समूह खरोखरी ख्रिस्ताची मंडळी आहे का नाही ते आणखी एका प्रकारे पाहता येईल. ते लोक प्रभूच्या वचनाप्रमाणे चालतात का नाही, प्रभूचे आज्ञापालन करतात का ते तपासून पाहावे, त्यांचे उद्देश, ध्येये आणि धोरणे निश्चित समजण्यासाठी काही प्रश्न पुढे दिले आहेत. या प्रश्नांची उत्तरे त्यांच्याकडून घ्यावीत.

नव्या करारातील मंडळी व्हावे असा तुमचा प्रयत्न, उद्देश आहे का?

तुमच्या मंडळीमध्ये प्रीती, दया, ऐक्य, करुणा आणि समाज सेवा यांचे आचरण होते का?

रविवारी तुम्ही उपासनेसाठी एकत्र येता तेव्हा तुमची उपासना कशी कोणत्या रीतीने होते?

प्रे. कृ.२०:७ प्रमाणे तुम्ही प्रत्येक आठवड्याच्या पहिल्या दिवशी. (प्रत्येक रविवारी) प्रभूभोजनात सहभागी होता का?

नव्या करारामधील उदाहरणाला अनुसरून तुम्ही वाद्यांच्या साथीशिवाय गीते गाता का?

तुम्ही येशूच्या नावाने प्रार्थना करता का?

आपले एकमेव धर्मविश्वास मत आणि मार्गदर्शक म्हणून तुम्ही पवित्र शास्त्राचा अभ्यास करता का?

जशी बरकत झाली असेल त्याप्रमाणे तुम्ही दर रविवारी प्रभूला दान देता

का (१ करिंथ.१६:१,२)?

मंडळी म्हणून तुम्ही कसे संघटित झाला आहात? तुमच्याकडे उपदेशक, शिक्षक, वडील आणि सेवक (डिकत) यांच्यापेक्षा संघटनाच अधिक आहेत का?[१]

तुमच्याकडे मंडळीचा प्रमुख एखादा मनुष्य आहे का? किंवा तुम्ही आपला प्रमुख म्हणून केवळ प्रभू ख्रिस्तावर विसंबून राहता?[२]

या जगात तुमचे कार्यध्येय काय आहे? आमच्या प्रभूने सोपवलेली महान कामगिरी पूर्ण करण्यास तुम्ही प्रयत्नशील आहात का (मत्तय.२८:१९,२०)?

हे प्रश्न विचारणे सुज्ञतेचे लक्षण आहे. कारण हा लोकांचा समूह – गट नेमका कसा कोणत्या स्वरूपाचा आहे ते तुम्ही लक्षात घेत आहा. खरे तर तुम्हाला प्रभूच्या मंडळीचा सभासद सदस्य व्हायचे आहे. एखाद्या पंथाचा संप्रदायाचा सदस्य व्हायचे नाही. (तक्ता पाहा, ‘‘पवित्रशास्त्रानुसार नवीन मंडळीची स्थापना कशी करावी’’ परिशिष्ठ–२)

तुम्हाला ख्रिस्ताची मंडळी सापडली नाही तर तुम्ही स्वत:च अशी मंडळे स्थापन करा. हे तुम्ही असे करावे – एखादी समविचारी, खऱ्या देवाची सेवा करण्यास उत्सुक अशी व्यक्ती पाहा. त्याला हे पुस्तक वाचण्यास द्या आपल्या पवित्र शास्त्राचा अभ्यास करताना त्याने हे पुस्तक ही वाचावे. मग त्याला विचारा तो ही तुमच्याबरोबर ख्रिस्ताचा स्वीकार करून ख्रिस्त होईल का तसेच तुमच्या समाजात तुमच्याबरोबर प्रभूची मंडळी होण्यास तयार आहे का? तोही ख्रिस्ताला अनुसरण्यास तयार असेल तर तुम्हाला एकमेकांना बाप्तिस्मा देण्यास कोणतीच हरकत नाही, मग त्याच्यासह नजीकच्या

---

[१]नव्या करारामध्ये मंडळ्यांची संघटना व्यवस्था अगदी सरळ साधी होती. प्रथम त्यात आचार्य व शिक्षक असत ते वचनातून संदेश व शिक्षण देत. दुसरे असे की मंडळी पुरेशी परिपक्व झाली की तेथे अनेक वडील असत. (त्यांना केव्हा देखरेख ठेवणारे मेंढपाळ व पाळक म्हटले आहे). ते उपासक समूहाला मार्गदर्शन करीत, त्यांच्यावर देखरेख ठेवीत. तिसरे असे की, प्रत्येक मंडळीत सेवक धर्मसेवक डिकन असत. ते वडिलांच्या देखरेखीखाली आपले काम करीत.

[२]नव्या करारामध्ये मंडळीचा प्रमुख एकच असल्याचे स्पष्ट केले आहे. मंडळीचा प्रमुख–मस्तक ख्रिस्तच आहे. ख्रिस्ताच्या मंडळीचे पृथ्वीवर, या जगात मुख्यालय नाही, मंडळीतील प्रत्येक उपासक समूह फक्त ख्रिस्ताचे नेतृत्व मान्य करतो.

नदीवर अगर तलावावर जावे. (मात्र तेथे संपूर्ण शरीर बुडण्याएवढे भरपूर पाणी आहे याची खात्री करून घ्या).

त्याला बाप्तिस्मा देताना आपण शास्त्रलेखामधील तीन आज्ञांचे पालन केले आहे. याची खात्री करून घ्या प्रथम त्याला हा प्रश्न विचारा, येशू ख्रिस्त देवाचा पुत्र आहे यावर तुम्ही विश्वास ठेवता का? ही आज्ञा रोम १०:१० या वचनात आहे. आणि यावर त्याने होय देवाचा पुत्र म्हणून येशूवर माझा विश्वास आहे असा प्रतिसाद दिला पाहिजे.


दुसरे असे की तुम्ही त्या माणसाला ख्रिस्ताच्या देहात शरीरात मंडळीमध्ये पापांची क्षमा व्हावी यासाठी बाप्तिस्मा देत आहात याची खात्री पटवावी, यासाठी त्याला बाप्तिस्मा देण्यापूर्वी काय घडते आहे ते मोठ्याने स्पष्ट शब्दांत सांगा तेथे उपस्थित असलेल्यांसाठी व बाप्तिस्मा घेणाऱ्यासाठी हे स्मरण देणे गरजेचे आहे. हे कसे सांगावे त्याचे एक उदाहरण पुढे दिले आहे (या वर्णनाला पुढील शास्त्रपाठांचा आधार आहे: मत्तय.२८:१९,२०; रोम.६:३; प्रे. कृ.२:३८ आणि मार्क.१६:१६).

> ख्रिस्ताच्या आज्ञेला अनुसरून येशू ख्रिस्ताच्या रक्ताच्या व्दारे तुमच्या पापांची क्षमा होण्यासाठी मी तुम्हाला नव्या करारातील मंडळीत, ख्रिस्ताच्या आध्यात्मिक शरीरात पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा याच्या नावाने बाप्तिस्मा देत आहे.

तिसरे असे की, त्याला बाप्तिस्मा देताना तो पाण्यामध्ये पूर्णपणे बुडला जाईल याकडे लक्ष द्यावे. लक्षात ठेवा नव्या करारामधील बाप्तिस्मा पाण्यामध्ये पुरले जाणे अतिप्रेत आहे (रोम ६:४). बाप्तिस्मा कसा करावा - घ्यावा त्याची काही उदाहरणे येथे दिली आहेत.



उथळ पाण्यामध्ये, जो बाप्तिस्मा घेणारा आहे त्याने खाली बसावे आणि तो पूर्णपणे पाण्यामध्ये बुडल्या जात नाही तोपर्यंत त्याला मागे झुकवावे.



अतिखोल पाण्याच्या बॅप्टायझरीमध्ये किंवा नैसर्गिक पाण्याच्या प्रवाहा जवळ, जो बाप्तिस्मा घेणारा आहे त्याला मागे झुकवावे जोपर्यंत तो पूर्णपणे पाण्यामध्ये बुडत नाही.

त्याला बाप्तिस्मा दिल्यानंतर तुम्हीही त्याच्याकडून त्याच प्रकारे बाप्तिस्मा घ्या. तुम्ही त्याला विचारलेत तेच प्रश्न त्यानेही तुम्हाला विचारावेत आणि आपण तुम्हाला बाप्तिस्मा का देत आहो तेही तसेच स्पष्ट शब्दांत जाहीरपणे सांगितले पाहिजे.

या प्रकारे तुम्ही बाप्तिस्मा घेतला की तुम्ही ख्रिस्ती प्रभूच्या मंडळीचे सदस्य या संज्ञेस पात्र झाला आहात. तुमच्या समाजात विभागात आतापर्यंत प्रभूच्या मंडळीचे अस्तित्व नसले तरी आता ती अस्तित्वात आली आहे – कारण तुम्हीच ख्रिस्ताची मंडळी आहात. ख्रिस्ती होऊन तुम्ही राहत आहात तेथेच मंडळी स्थापन केली आहे.

## टप्पा दोन: ख्रिस्त म्हणून जीवनक्रम चालवणे

आता या पुढचे उचलायचे पाऊल अगर टप्पा कधी न संपणारा आहे. या टप्प्यावर ख्रिस्ती या नात्याने कालक्रमणा करायची आहे. आता तुम्ही ख्रिस्ती आहात आणि ख्रिस्ती म्हणून राहावे हीच तुमची इच्छा असणार (''वडील असावेत तसेच सर्व ख्रिस्तीजन असले पाहिजेत'' तक्ता पहा, परिशिष्ट २ मध्ये)

ख्रिस्ती मनुष्य कसा राहतो? कसा जगतो? ख्रिस्ती मनुष्याच्या जीवनाचा आलेख सारांशरूपाने सांगायचा तर ते त्याच्या ख्रिस्ती या नावावरूनच स्पष्ट होते. ख्रिस्ती म्हणजे तो ख्रिस्ताचा अनुयायी आहे. ख्रिस्त राहिला तसाच तो राहतो (फिलिप्पै. १:२१). ख्रिस्ती व्यक्तीला ख्रिस्त हेच जीवन आहे.

### शास्त्रलेख शोधून पाहणे

ख्रिस्ताला अनुसरणाऱ्या कोणाही व्यक्तीमध्ये हे महत्त्वाचे लक्षण आढळेल. पित्याच्या इच्छेच्या अधीन असणे. येशू सर्वतोपरी परिपूर्ण होता आणि तो देवपित्याचे निष्ठापूर्वक विश्वासाने आज्ञापालन करीत होता. आपणालाही त्याच्या या गुणलक्षणाचे सहज अनुकरण करता येईल. ख्रिस्ती जीवनात शास्त्रलेखांचे वाचन, मनन, अभ्यास करणे, त्यातून देवाची इच्छा पाहणे समजून घेणे आणि मग अगदी नम्रपणे आदरपूर्वक, प्रीतीने त्या इच्छेनुसार आज्ञा पाळणे. ख्रिस्ती व्यक्ती नेहमीच देवाच्या वचनाच्या निकट असतो. तो दररोज वचन वाचतो आणि त्यातून मिळालेल्या शिक्षणानुसार आचरण ठेवतो.

### येशूच्या जीवनशैलीचे अनुकरण करणे

येशूसाठी जगायचे तर आम्ही आणखी तीन तत्त्वांनुसार आचरण ठेवले पाहिजे. ही

तत्त्वे अशी : सुवर्ण नियम करुणा आणि प्रार्थना. येशूचे अनुकरण करण्याचा उत्तम मार्ग म्हणजे नेहमी स्वत:ला विचारणे : मला इतरांनी कसे वागवावे? मत्तय ७:१२ मधील सुवर्णनियमाचे पलन करण्यासाठी प्रथम लोकांनी आम्हाला कसे वागवावे ते ठरवून लोकांनाही तशीच वागणूक द्यायची. ख्रिस्ताच्या जीवनक्रमाचा हाच नियम होता आणि या जगामध्ये याच नियमानुसार राहणे श्रेयस्कर व हितकारक आहे.

येशू करुणामय, दयाशील, दुसऱ्यांविषयी सहानुभूती असणारा होता. सहानुभूती म्हणजे दुसऱ्याच्या दु:खाचा-वेदना इ. चा मनाने अनुभव घेणे. गोरगरीब, गरजवंत आणि एकाकी अशा सर्वच दु:खितांवर येशूची प्रीती होती. त्यांच्याबद्दल त्याला अतिशय आपुलकी आणि जिव्हाळा होता. त्याच्या दु:खावेदनांचा भार त्याच्या अंत:करणावर होता. ख्रिस्ती व्यक्तीनेही दुसऱ्यांबद्दल अशीच आपुलकी जिव्हाळा दाखवावा आणि त्यांना शक्य तो जमेल तेवढी मदत करून त्यांच्यावरील प्रीती प्रकट करावी (मत्तय.९:३६).

येशू देवाचा पुत्र होता तरीही तो वारंवार देवपित्याला-प्रार्थना, विनवणी करीत होता. त्याची प्रार्थना सार्वजनिक असे, लहान गटाबरोबर असे आणि एकट्याने एकांतात असे. ख्रिस्ती माणूसही सतत देवाला विनंती प्रार्थना करतो.

आता तुम्ही ख्रिस्ती आहात, तेव्हा देव तुमचा पिता आहे. त्याने तुम्हाला आपला स्वत:चा म्हणून घेतले आहे. नियमितपणे त्याला विनवणी प्रार्थना करा. त्याची इच्छा तुमच्या जीवनात पूर्ण व्हावी यासाठी विनंती करा, येशूच्या नावाने त्याच्याकडे मागा, प्रार्थना करा. विश्वासाने नियमित प्रार्थना करा. देवाला प्रार्थना विनंती कशी करावी ते समजण्यासाठी एक नमुना प्रार्थना पुढे दिली आहे.

देवाला संबोधून बोला : प्रिय पित्या,
त्याची स्तुती करा : तुझे नाम पवित्र मानिले जावे.
त्याचे आभार माना : तू आम्हाला दिलेल्या आशीर्वादांबद्दल आम्ही तुझे फार उपकार मानतो (काही आशीर्वादांचा उल्लेख करा)
त्याला विनंती करा : आम्हाला पाहिजे, तेवढेच आम्ही सांगू शकतो. जर ह्या विनंत्या तुझ्या इच्छेप्रमाणे आहेत तर ह्याचा स्वीकार.
त्याला विनंती करा : आम्ही इतरांना क्षमा करतो तशी आम्हाला आमच्या पापांची क्षमा कर. वाईटापासून आमची सुटका कर.

त्याची स्तुती करा : सर्व गौरव तुला असो.
समाप्ती : येशूच्या नावाने आम्ही प्रार्थना करतो. आमेन.

प्रभूने आपल्या शिष्यांना आदर्श, नमुनेदार प्रार्थना करण्यास शिकवले (मत्तय. ६:९-१३) त्याच नमुन्यावर ही प्रार्थना आधारली आहे, हे तुमच्या लक्षात आलेच असेल. त्या प्रार्थनेतील काही भाग आपल्याला लागू पडत नाही (उदाहरणार्थ तुझे राज्य येवो ही विनंती कारण पेंटेकॉस्टच्या दिवशी त्याचे राज्य आले). तथापि, त्यातील बराचसा भाग आपणाला लागू पडतो. लक्षात ठेवा वरील प्रार्थनेचा साचा केवळ नमुना उदाहरण आहे. आपले विचार-मागण्या देवासमोर सादर करण्याचा क्रम कसा असावा तेवढेच त्यातून लक्षात घ्यावे.

तुम्ही परिपूर्ण होणार नाही. हे सत्य पुन्हा नीट लक्षात घ्या. मानवप्राणी कधी परिपूर्ण होणे शक्य नाही. परंतु त्याची देवाची इच्छा पूर्ण करण्यास आम्हांला आपली अंत:करणे समर्पण करण्यास कोणताच प्रतिबंध नाही. आम्ही पडलो तर आम्हाला फिरून उठता येते. अंग झटकून, पश्चात्ताप करुन देवाकडे क्षमायाचना करू शकतो आणि पुन्हा नेटाने त्याची इच्छा पूर्ण करण्यास पुढे होऊ. आम्ही त्याची इच्छा पूर्ण करण्यास अथक प्रयत्न करतो आहोत हेच सर्वात महत्त्वाचे आहे. विश्वासाच्या द्वारे, देवाच्या कृपेने परिपूर्णतेने नव्हे - आमचे तारण होईल (इफिस.२:८). विश्वास असणे म्हणजे प्रामाणिकपणे त्याची इच्छा पूर्ण करण्यास झटणे.

आम्हाला अपयश आले, त्यामुळे इतरांचे नुकसान झाले तर आपण त्यांची क्षमा मागावी, आम्हांलाही वाईट वाटते आणि आम्ही असे होऊ देणार नाही याची खात्री द्यावी (याकोब.५:१६). आम्ही पाप केले, आमच्या पापाने संपूर्ण मंडळींची हानी झाली तर आपण मंडळी पुढे येऊन मंडळीची क्षमा मागावी आणि ख्रिस्तामधील आमच्या बंधूभगिनींनी आमच्यासाठी प्रार्थना करावी असे त्यांना नम्रपणे सांगावे (याकोब.५:१६). देव आम्हाला क्षमा करील आणि मंडळीही आम्हाला क्षमा करील.

ख्रिस्ती या नात्याने जीवनाला आरंभ करताना तुम्ही शास्त्रलेखांचा नव्या करारातील आरंभीचा भाग म्हणजे मत्तय, मार्क, लूक व योहान ही चार शुभवर्तमाने - ख्रिस्ताचे चरित्र - काळजीपूर्वक वाचावे. शुभवर्तमानांचे वाचन व अभ्यास यातून तुम्हाला येशू या पृथ्वीवर कसा राहिला ते नीट समजेल. त्याच्याविषयी तुम्ही जेवढे अधिक शिकाल त्यातून तुम्ही त्याच्या अगदी निकट जाल.

## टप्पा तीन : देवाची उपासना करणे

नियमितपणे देवाची उपासना करणे हे ख्रिस्ती होण्यासाठी उचलायचे तिसरे पाऊल आहे. उपासनेचा आरंभ हा या वाटचालीतील तिसरा टप्पा आहे. तुमच्या परिसरात

ख्रिस्ताची मंडळी असेल तर येथील उपासकांना दर रविवारी व उपासनेच्या इतर वेळी भेटून सामूहिक उपासनेमध्ये सहभागी होणे अगत्याचे आहे. हे उपासक दर रविवारी एकत्र जमतात, गीते गातात, प्रार्थना करतात, देवाच्या वचनांचा अभ्यास करतात, प्रभूभोजनाचा विधी करतात आणि देवाने आशीर्वाद दिला असेल त्याप्रमाणे आपल्या पैशातून देवाला दान देतात. उपासनेच्या या सर्व भागांत तुम्ही त्यांच्याबरोबर जरुर भाग घ्यावा. (पाहा पान क्र.130.)

तुमच्या जवळपास प्रभूची मंडळी नसेल, उपासक सभासद उपासनेसाठी एकत्र जमत नसतील तर तुम्ही स्वत:च आपल्या घरात विश्वासाने, नित्यनियमाने उपासना सुरू करावी. तुमच्या घरात शक्य नसेल तर जवळच्या एखाद्या मोकळ्या घरात अगर झाडाखाली उपासना घ्यावी. पुढे यथाकाल अधिकाऱ्यांची परवानगी मिळाली की उपासनेसाठी स्वतंत्र इमारत बांधता येईल. येशूच्या नावाने दोघे अगर तिघे एकत्र जमले असतील तेथे कोठेही शास्त्रानुसार उपासना करता येईल असे नवा करार सांगतो (मत्तय.१८:२०).

## मंडळी या नात्याने एकत्र जमणे

नव्या कराराच्या काळात आरंभीचे ख्रिस्ती लोक आठवड्याच्या पहिल्या दिवशी रविवारी एकत्र जमत. प्रभू मेलेल्यांतून उठला तो हाच दिवस होता. पहिले ख्रिस्ती लोक उपासनेसाठी रविवारी एकत्र येत तेव्हा येशूने आपले मरण व पुनरुत्थान यांच्या स्मरणार्थ स्थापन केलेल्या भोजनात सहभागी होत. ते दर रविवारी या भोजनात सहभागी होत हे स्पष्टच आहे. हेच प्रभूभोजन (पवित्र सहभागिता) आहे (१ करिंथ.११:२०) प्रत्येक प्रभूच्या दिवशी – प्रभुवारी म्हणजेच रविवारी ख्रिस्ती लोक हे भोजन घेत. इब्री. १०:२५; १ करिंथ.११:२२; १६:१,२ आणि प्रे.कृ.२०:७ या शास्त्रवचनांचा नीट काळजीपूर्वक अभ्यास करा.

## प्रभूभोजनाचा विधी पाळणे

ख्रिस्ताने प्रभूभोजन स्थापन केले तेव्हा त्याने दोन द्रव्यांचा उपयोग केला. द्राक्षवेलींचे फळ – द्राक्षरस आणि बेखमीर भाकरी. हा भोजनविधी सतत करा असे आमच्या प्रभूने सांगितले तेव्हा तो त्याच्या शिष्यांबरोबर वल्हांडणांचे भोजन करीत होता. वल्हांडणांच्या भोजनात फक्त बेखमीर भाकरी आणि एक पेय (द्राक्षांच्या रसाचे मिश्रण) पाणी मिसळलेला द्राक्षरस एवढेच होते. येशूने आपल्या शिष्यांना सांगितले या भाकरीतून खा आणि त्यांच्यासाठी दिलेल्या शरीराचे स्मरण ठेवा. त्याने त्यांना सांगितले त्या

प्याल्यातून द्राक्षांचा रस प्या आणि त्यांच्यासाठी सांडलेल्या रक्ताचे स्मरण करा.

तुम्हीही आमच्या प्रभूंच्या सूचनांचे पालन करावे आणि प्रेषितांच्या कृत्यांमध्ये दाखवल्याप्रमाणे ख्रिस्ती लोकांचे अनुकरण करावे. त्यांचा आदर्श समोर ठेवावा. प्रत्येक रविवारी तुमच्यापैकी जे ख्रिस्ताचे आज्ञापालन करतात त्या सर्वांनी उपासनेसाठी एकत्र यावे. यावेळी तुम्ही गीते गावीत, प्रार्थना करावी, देवाच्या वचनांचा अभ्यास करावा आणि या उपासनेमध्ये ठरलेल्या वेळी या प्रभूभोजनात सहभागी व्हावे. एका बशीत/ताटलीत/ताटात बेखमीर भाकरी ठेवावी. ख्रिस्त शरीराचे दर्शक आणि त्याचे महान यज्ञार्पण याबद्दल देवाने तुमचे आभार धन्यवाद स्वीकारावेत यासाठी त्याला विनंती करा. मग भाकरीचे ते ताट प्रभूभोजनात सहभागी होणाऱ्या प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीसमोर करावे. या भाकरीचे सेवन करताना प्रत्येकाने येशूच्या शरीराचे स्मरण करावे.

प्रभूभोजनासाठी लागणारी भाकरी तयार करण्यासाठी अगदी साधे नित्याच्या वापरातले जिन्नस लागतात : पीठ (गव्हाचे) मीठ व तेल. आपल्या तळहाताएवढ्या दोन भाकरी तयार करण्यासाठी लागणारे जिन्नस पुढीलप्रमाणे :

घटक पदार्थ :
१ वाटी गव्हाचे पीठ किंवा मैदा
१ चमचा पाणी
३ चमचे तेल
चिमूटभर मीठ

कृती
वर दिलेले घटक पदार्थ एकत्र मिसळा. पिठाचा गोळा लाटण्याने पोळपाटावर लाटून त्याची पोळी करा. मग त्याला छिद्रे पाडून मायक्रोवेव्ह ओव्हनमध्ये १७५ सेंटिग्रेड एवढ्या उष्णतेवर भाजा. तयार भाकरी तांबूस रंगाची व्हावी हीच भाकरी तव्यावरही भाजता येईल. ती कुरकरीत भाजावी.

नंतर द्राक्षरसाने भरलेले लहान पेले घ्या. देवाची प्रार्थना करा. द्राक्षरसाचा पेला त्यात लाक्षणिक अर्थाने असलेले येशूचे आमच्या पापांची क्षमा व्हावी यासाठी सांडलेले मोलवान रक्त यासाठी देवाची उपकारस्तुती करा. प्रार्थनेनंतर तेथे असलेल्या ख्रिस्ती लोकांना द्राक्षरसाने भरलेला एकेक पेला द्यावा. प्रत्येकाने पेल्यातून सेवन करावे आणि येशूने आमच्यासाठी सांडलेल्या रक्ताचे स्मरण करावे.

येशूने या भोजनाची स्थापना केली तेव्हा त्याने द्राक्षाचा उपज; द्राक्षवेलाचा उपज

म्हणजे द्राक्षरस म्हटले आहे. द्राक्षरस-द्राक्षासव जगात सर्वत्र सहज मिळू शकतो. समजा तुमच्या भागात तो मिळत नसेल तर द्राक्षे पेल्यात हाताने पिळून-चिरडून रस तयार करता येईल. हा रस नीट टिकवून ठेवला तर द्राक्षांचा हंगाम संपल्यावर वर्षभर सहज उपलब्ध होईल. मनुका - बेदाणे ही वाळलेली द्राक्षे ती पाण्यात टाकून पाणी उकळूनही असा रस तयार करणे शक्य आहे. पाण्यात उकळलेले मनुका बेदाणे चांगले चुरडून पिळून उरलेला द्रव पदार्थ गाळून घ्यावा आणि प्रभूभोजन विधीसाठी वापरावा.

**देवाला दान देणे किंवा त्यासाठी राखून ठेवणे**

प्रत्येक ख्रिस्त व्यक्तीने प्रभूच्या कार्यासाठी दान देण्यासाठी पैसे बचत करून एकीकडे ठेवावेत. मंडळी उपासनेसाठी जमली उपासना सुरू झाली की देवाला दान देण्यासाठी मंडळीला सांगावे व त्यानुसार प्रत्येकाने मनात ठरवल्याप्रमाणे देवाला द्यावे. दान देणे हा उपासनेतील एक भाग असावा. नव्या करारामध्ये शिकविल्याप्रमाणे प्रत्येक ख्रिस्त स्त्रीने व पुरुषाने देवाला बरकत दिली असेल त्याप्रमाणे द्यावे (१ करिंथ.१६:१,२). दान गोळा करण्यासाठी दानपात्र - तबक - वगैरेची व्यवस्था करावी. तसेच उपासना मंदिरात एखाद्या मेजावर ख्रिस्ती लोकांनी देवासाठी आणलेल्या वस्तू मौल्यवान चिजा ठेवण्यासाठी पैसे देण्यासाठी एक कुलूप बंद पेटी ठेवावी. दान देणे हाही उपासनेचा अविभाज्य घटक आहे. हे लक्षात ठेवा आणि संतोषाने, आनंदाने देवाला द्यावे. मिळालेले दान, देणग्या हे सर्व मंडळीच्या कार्यासाठी वापराव्यात. या देणग्यातून सुवार्ताप्रसार, गोरगरिबांना साहाय्य अभ्यासासाठी पवित्र शास्त्राच्या प्रती, गीतांची पुस्तके विकत घेणे यासाठी खर्च करावा. तसेच मंडळीच्या ध्येय धोरणांना अनुसरून इतर धार्मिक कार्यासाठीही यातून खर्च करण्यास हरकत नाही. हे पैसे कसे कशासाठी खर्च करावेत ते एका व्यक्तीने नव्हे तर मंडळीने ठरवावे.

उपासना सभा कशी असावी, त्याची योजना कशी करावी त्याचे एक उदाहरण पुढे दिले आहे:

प्रार्थना
गीत अथवा गीते
शास्त्रलेखातील एखाद्या अध्याय/शास्त्रपाठ घेऊन त्यावर चर्चा अगर सक्षम शिक्षक किंवा प्रचारक असतील तर ते संदेश देतील.
गीत
प्रभूभोजनासंबधी शास्त्रपाठ वाचन

प्रभूभोजन विधीत सहभागी होणे
गीत
बरकत झाली असेल त्यानुसार प्रत्येकाने दान देणे
गीत
प्रार्थना

उपासनेचे नियोजन याहून वेगळया प्रकारे केले तरी त्यात वर दिलेल्या सर्व घटकांचा अंतर्भाव असावा.

**स्वतंत्र, स्वावलंबी मंडळीच्या सभांचे संचालन करणे**

स्थानिक मंडळीचे सेवाकार्य योग्य प्रकारे शिस्तशीर व व्यवस्थितपणे चालावे (१ करिंथ.१४:४०) यासाठी पुरूष सभासदांनी वेळोवेळी एकत्र येऊन विचार चर्चा करणे जरूरीचे आहे. मंडळीमध्ये वडील मंडळ नसेल तर हे एकत्र येणे अधिकच आवश्यक आहे. या सभांमध्ये देवासाठी देवाच्या वतीने नियम तयार करायचे नाहीत. स्थानिक मंडळीचे कार्य आणि उपासना ख्रिस्ताला साजेल अशा प्रकारे व्हावे – चालावे हाच या सभा व त्यातील चर्चा यांचा उद्देश आहे. उपासनेच्या वेळा ठरवणे, उपासना चालवण्यासाठी साहाय्यकांना जबाबदारी सोपवणे, चांगली कामे करण्यासाठी योजना तयार करणे इतर आध्यात्मिक बाबींवर विचार चर्चा करणे ही कामे या सभांमधून ठरावीत या सभांमध्ये भाग घेणाऱ्या प्रत्येकाने ख्रिस्ताला शोभेल अशीच स्वत:ची वागणूक ठेवावी (इफिस.४:१–३) कोणी तरी म्हटले आहे, प्रत्येकाला आपले म्हणने मत मांडायचा हक्क आहे पण आपलेच म्हणने सर्वांनी मान्य करावे असे समजण्याचा, तशी अपेक्षा करण्याचा हक्क कोणालाच नाही.बोध वाक्य चांगले, अनुकरणीय आहे.स्वतंत्र स्वावलंबी मंडळीच्या (काँग्रिगेशनल) कार्याची चर्चा निर्णय होत असताना घेतलेल्या प्रत्येक निर्णयाविषयी हे प्रश्न विचारावेत :

- हा निर्णय पवित्र शास्त्रानुसार आहे का?
- यामुळे देवाचा गौरव होईल का?
- यामुळे सभासदांची उन्नती होईल काय?
- हा निर्णय हिताचा, रास्त आहे का?

सभा बोलावणाऱ्या पुरुषांनी अशा सभा किती वेळा, केव्हा बोलवाव्यात, जास्तीत जास्त लोक येऊ शकतील अशा वेळा सर्वांच्या विचाराने ठरवाव्यात. सभासदांपैकी

एखाद्या प्रौढ व अनुभवी बंधूला सभेचा अध्यक्ष नेमावे अध्यक्ष शक्य तर प्रत्येक सभेसाठी वेगळा नेमावा हे चांगले. हे अधिकाराचे नव्हे तर देवासमोर जबाबदारीचे पद आहे. सभेचे कामकाज नीट व्हावे याकडे लक्ष ठेवावे. या सभांचे इतिवृत्त लिहिण्याची व्यवस्था करावी. सभेची व्यवस्था साधारणपणे अशी असावी:

प्रार्थना
पूर्वीच्या सभेचा वृत्तांत वाचणे – राहिलेल्या कामांविषयी खुलासा करणे, चालू कामांची प्रगती पाहणे – जबाबदाऱ्या कार्यभार सोपवणे.
नवे प्रस्ताव – गरजांचा विचार भावी योजना, आध्यात्मिक प्रश्नांसंबधी चर्चा, कामे नेमून देणे.
प्रार्थना

**दररोज देवाची उपासना करणे**

आपले कुटुंब, परिवार, मुलेबाळे यांच्यासह आणि आपल्या अंत:करणात दररोज देवाची उपासना करावी, प्रत्येक भोजनसमयी जेवण्यास सुरुवात करण्यापूर्वी देवाने पुरवलेल्या अन्नाबद्दल त्याचे उपकार माना, त्याला धन्यवाद द्या. तुमच्या बायको मुलांसह नियमितपणे प्रार्थना करा. तुमच्या गरजा देवाला सांगा. त्याने तुमच्यासाठी केले आहे त्याबद्दल त्याची उपकारस्तुती करा.

रविवारखेरीज इतर वेळी – दिवशी देवाची उपासना करावी असे तुम्हाला वाटेल अर्थात दर रविवारी तुम्ही मंडळीत उपासनेसाठी जावे या उपासनेमध्ये प्रभूभोजन विधीत सहभागी व्हावे आणि देवाला दान द्यावे. याशिवाय आठवड्यातील इतर दिवशी ख्रिस्ती बंधूभगिनींसह प्रार्थना, पवित्र, शास्त्र अभ्यास आणि गीत गायन यासाठी एकत्र जमावे. ख्रिस्ती लोकांनी वारंवार एकत्र जमणे आवश्यक आहे. त्यांनी एकत्र उपासना करावी आणि प्रभूमध्ये एकमेकांना बोध करावा. उत्तेजन द्यावे.

प्रभूचा सेवक या नात्याने तुम्ही त्याचे वचन वाचावे. त्याचा अभ्यास करावा आणि देव सांगतो ते नीट एकावे तसेच प्रार्थनेतून तुम्ही ही दरारोज देवाबरोबर बोलावे.

## टप्पा चार: चांगली कामे करणे

प्रभूची सेवा करणे हे चौथ्या टप्प्यावरचे चौथे पाऊल आहे. आता तुम्ही ख्रिस्ती, ख्रिस्ताचे अनुयायी आहात तेव्हा तो राहिला. वागला तसे तुम्हीही राहावे, वागावे. तो सत्कर्मे करीत फिरला असे त्याच्याविषयी सांगितले आहे (प्रे. कृ.१०:३८).

## सुवार्ता सांगणे

खिस्ती लोकांनी सुवार्ता प्रसार केला पाहिजे. दुसऱ्यांना सुवार्ता सांगितली पाहिजे. येशू परत स्वर्गात गेला तेव्हा जाण्यापूर्वी याने आम्हाला सांगितले की जगात जाऊन संपूर्ण सृष्टीला सुवार्तेची घोषणा करा (मार्क.१६:१५). सुवार्ता निर्माण करण्यासाठी खिस्ताने मरण सोसले आता. त्या सुवार्तेचा संदेश प्रत्येकापर्यंत पोचावा सर्वांनी तो ऐकावा यासाठी आपण कार्य केले पाहिजे दुसऱ्या लोकांना हे पुस्तक वाचण्यास सांगा ही सुवार्ता प्रसाराची एक रीत आहे. त्यांना खिस्ती होण्यास आवाहन करा. इतरांनी खिस्ताकडे यावे यासाठी आपण कार्य करावे.

## इतरांना बोध करणे

इतरांना बोध - मार्गदर्शन करणे हे ही खिस्ती माणसाचे काम आहे. बोध करणे म्हणजे त्यांना उत्तेजन देणे, मार्गदर्शन करणे तुम्ही पंधरा जणांची उपासकांची मंडळी स्थापन केली की कृपया ट्रुथ फॉर टुडे वर्ल्ड मिशन स्कूल या संस्थेला पत्र लिहा. (संस्थेचा पत्ता पान क्र. 263 वर आहे). आम्ही तुम्हाला पवित्र शास्त्राचा अभ्यास करण्यासाठी उपयुक्त साहित्य पाठवू. आपण खिस्ताच्या ज्ञानात व त्याच्या मार्गात सतत वाढत राहू या आणि इतरांनाही आमच्याबरोबर वाढून प्रगती साधण्यास उत्तेजन देऊ या.

## दुसऱ्यांना साहाय्य करणे

लोकहिताची कामे तुम्ही जरूर करावीत. तुम्ही स्वत:ला विचारा गोरगरीब गरजवंत यांना मला साहाय्य कसे करता येईल? गरजवंताची काळजी घेतली नाही तर तुम्ही खिस्तासारखे कसे होणार? (मत्तय.२५:३१-४६).

खिस्ती लोकांनी करावी अशी चांगली कामे पुढीलप्रमाणे आहेत:

दुसऱ्यांना सुवार्ता संदेश सांगणे - शिकवणे
आजाऱ्यांचा समाचार घेणे, सेवा करणे
लहान मुलांना देवाविषयी शिक्षण देणे
भुकेल्यांना भोजन देणे
विधवा व अनाथ, पोरकी मुले यांना मदत करा.
कैदेत पडलेल्यांना जाऊन भेटा
पाहुणचार, अतिथी सत्कार करा
खिस्ती साहित्याचा प्रसार करा.
इतरांना उपासना सभेसाठी आमंत्रण द्या

इतरांसाठी प्रार्थना करा
वाचता येत नाही अशा लोकांना पवित्र शास्त्र वाचून दाखवा

येशू या जगामध्ये सेवा करावयास आला. तो दुसऱ्यांकडून सेवा करून घ्यावयास नव्हे तर इतरांची सेवा करावयास आणि अनेकांच्या साठी आपला जीव खंडणी म्हणून द्यावयास आला (मार्क.१०:४५). येशूने इतरांसाठी संपूर्ण जगासाठी आपले प्राण दिले. त्याने मरण सोसले तसे आपण करू शकणार नाही. परंतु इतरांना सुवार्तेचे शिक्षण देणे, त्यांना ख्रिस्तामध्ये वाढण्यास मदत करणे, दु:खितांचे अश्रू पुसणे. त्यांना दयेने वागवणे वगैरे केल्याने आपणाला इतरांसाठी जगता येते.

## समारोप

प्रे. कृ.८ मध्ये कांदके राणीचा दृबशी (इथिओपिअन) खजिनदाराविषयी तुम्ही वाचलेच असेल? वाचले नसेल तर आताच थोडे थांबा आणि हा वृत्तांत वाचा. त्याला सुवार्तेचे शिक्षण देण्यासाठी फिलिप्पाला त्याच्याकडे पाठवले तेव्हा त्या दिवशी सरदाराने आनंदाने सुवार्तेचा स्वीकार केला.

फिलिप्पाला दिव्य प्रेरणा लाभली होती. तुम्ही वाचत आहा हे पुस्तक ईश्वर प्रेरित नाही. (पण नवा करार ईश्वर प्रेरित आहे) परंतु तुम्ही येथे ख्रिस्ताने सिध्द केले तारण आणि त्याने स्थापन केलेली मंडळी याविषयी नवा करार काय सांगतो, शिकवतो ते तुम्ही या पुस्तकामधून पाहिले आहे. या पुस्तकाच्या साहाय्याने तुम्ही ईश्वर प्रेरित ग्रंथाकडे पवित्र शास्त्राकडे वळलात, तुम्हाला पवित्र शास्त्राचा परिचय झाला. या पुस्तकातून आम्ही तुम्हाला शिकवले ते आणि नवा करार काय शिकवतो ते पाहा. दोहोंची तुलना करा. नवा करार शिकवतो तेच आम्ही शिकवतो असे तुमच्या लक्षात येईल.

देवाने त्या हबशी खजिनदाराला तारणप्राप्तीची संधी दिली. त्याला दीर्घकाळ शिक्षण दिले असे नाही. पण ख्रिस्ती कसे व्हावे ख्रिस्ती म्हणून वर्तन, आचरण कसे ठेवावे ते समजण्यास त्याला दिलेले शिक्षण पुरेसे होते. आम्हीही तुम्हाला तेच शिक्षण देण्याचा प्रयत्न केला आहे. संधी तुम्हाला मिळाली आहे. तिचा लाभ घेणे तुमच्याच हाती आहे. या संधीचा तुम्ही सर्वतोपरी पुरेपूर उपयोग करावा आणि सत्याचा स्वीकार करावा. हीच आमची मनापासून इच्छा आहे. आम्ही मोठ्या अपेक्षेने, आपुलकीने तुमचा निरोप घेत आहोत. देवाने आपल्या पुत्राच्या व्दारे दिलेल्या सुवार्तेचा आज्ञाधारकपणे स्वीकार करताना देवाचे विपुल आशीर्वाद तुम्हाला प्राप्त होवोत. येथे पृथ्वीवर भेटू न

भेटू परंतु स्वर्गामध्ये मात्र तुमची आमची भेट निश्चित होईल.

## अभ्यासासाठी प्रश्न

*(उत्तरे पृष्ठ 243 वर आहेत)*

१. या येशूचे तुम्ही काय करणार या प्रश्नामागे सार्वकालिक महत्त्वाचे मुद्दे आहेत. त्याचे कारण काय?

२. बालके, तान्ही बाळे व लहान मुले यांना बाप्तिस्मा करण्याची गरज आहे का? किंवा का नाही?

३. बाप्तिस्म्याचा उद्देश काय, कोणता आहे?

४. ख्रिस्ताची मंडळी शोधण्यासाठी कोणते चांगले प्रश्न विचारावेत? त्यापैकी काही सांगा.

५. बाप्तिस्मा म्हणजे पाण्यामध्ये पुरले जाणे हे कोणत्या शास्त्रवचनातून शिकवले आहे?

६. ख्रिस्ती व्यक्तीचे जीवन सारांश रूपाने कोणत्या प्रकारे चांगले सांगता येईल?

७. ख्रिस्ती माणसाने देवाच्या वचनाला अगदी बिलगून का राहावे?

८. ख्रिस्ताची मंडळी प्रत्येक रविवारी देवाची उपासना करण्यास एकत्र जमते त्यावेळी उपासना करावी त्यात कोणते घटक असावेत.

९. येशूने प्रभूभोजन विधी स्थापन केला तेव्हा त्याने कोणती दोन द्रव्ये वापरली?

१०. ख्रिस्ती होऊन ख्रिस्ती म्हणून राहण्यासाठी तुम्हाला कोणती चार पावले उचलली पाहिजेत?

## शब्दार्थ

**शास्त्रलेख पवित्र शास्त्र –** जुना करार आणि नवा करार जुन्या करारात देवाने यहुदी लोकांना दिलेले नियमशास्त्र होते. आणि त्यातून नव्या कराराकडे निर्देश केला आहे (गलती.३:२४). नवा करार आज सर्वांनी पालन करावा यासाठी आहे. जुन्या करारामध्ये देवाने सृष्टी उत्पन्न केल्याचे सारांश रूपाने सांगितले आहे. त्याच्या निवडलेल्या लोकांना इस्राएलला दिलेले नियम आहेत. दिव्य प्रेरित काव्य आणि देवाने आपल्या संदेष्ट्यांच्या व्दारे दिलेले शिक्षण हे सर्व आहे.